
# कुक्कुटपालन

## उपजीविकेचे एक योग्य स्त्रोत



दिलासा जनविकास प्रतिष्ठान

## प्रस्तावना :-

आज कुक्कुटपालना विषयी लोकांचे मत बदलले आहे तसेच सरकारने यांच्याकडे लक्ष केंन्दीत केले आहे . तरी सुदधा हा व्यवसाय चागंला आहे. असे सांगुन चालणार नाही . तर या व्यावसाया विषयी लोकांच्या मनात ज्या चुकीच्या माहीती आहेत . त्या काढुन टाकल्या पाहीजे . तरच कुक्कुटपालन व्यवसायाचे प्रसार वाढेल . ३० ते ३५ वर्षा पुर्वी हा व्यवसाय हलका समजला जात असे परंतु सध्या या व्यवसायात अमुलाग्र बदल घडत चांलला आहे . अधिक उत्पादन देणा-या सुधारीत जाती रोग प्रतिकारक औषधे नवीन तंत्रज्ञान आधुनीक व्यवस्थापन पदधत व उत्पादन मालाची विकि या सर्व गोष्टी स्थिर झाल्यामुळे हा व्यवसाय आपल्या देशात चागंल्या प्रकारे प्रसारीत होवु लागला . सरकार व बॅका यांनी सुदधा या धंदयाच्या वाढीसाठी अधिक प्रमानात कर्ज देण्यास सुरवात केली आहे . या व्यवसायात भांडवलाची परत फेड शक्य असल्याने तरून या व्यवसायात येतात .

## उददेश

➤ कुक्कुटपालना विषयी लोकांना माहिती पटवुन देणे .

-

## ☐ कोवंडयाच्या जाती व वर्गीकरन

अ ]वर्णनानुसार केलेले वर्गीकरन

१) हलक्या जाती

अ) व्हाईट लेगहॉर्न

ब )ब्राउन लेगहॉन

२) भारी जाती

अ) व्हाईट रॉक

ब)-होड आयलंड

क)न्यु हॅम्पशायर

ब] उपयुक्तेनुसार केलेले वर्गीकरण

१) अंडी देणारी कोवंडी

ः लेग हॉर्नच्या सर्व जाती

२)मांस देणारी पक्षी

ः ब्रॉयलर

३) दुहेरी उददेशीय जाती

ः -होड आयलंड

१)हलक्या जाती

ः वजनांनी हलकी असल्याने त्यानां हलक्या जाती म्हणतात. अंडयाचे प्रमान २३० ते २६० नग वार्षीक सरासरी असुन भरपुर प्रमानात अंडी देतात. या जाती नाजूक असल्याने रोगाला लवकर बळी पडतात. त्यासाठी त्याना वेळेवर लसीकरन करावे लागते. जास्त पावसाच्या भागामध्ये टिकू शकत नाही. या जातीच्या कोवंडयाची अंडी पांढरी शुभ्र असल्याने त्याना भरपुर मागनी आहे.

**अंडी देण्याचे प्रमान वर्षाला २५० नग.**

# वैशिष्टये

- अ) व्हॉईट लेग हॉर्न ः
- १) डौलदार, चपळ.
- २)नर ऐट डौलदार दिसतो.
- ३) मादीच्या व नराच्या डोक्यावर लाल तुरा असतो.
- ४) पायांचा रंग पिवळा असतो.
- ५) अंडी देण्याचे प्रमान वर्षाला २५० नग.

## व्हॉईट लेग हॉर्न



## ब)ब्राउन लेग हॉर्न ः

१) कोवडी दिसण्यास आकर्षक .

२) नराचे शेपुट काळया रंगाचे .

३) पिसाचा रंग तपकीरी .

४) सरासरी अंडयाचे प्रमान वर्षाला २८० ते ३०० नग

ब्राउन लेग हॉर्न



व)भारी जाती :

वजनाला भारी मात्र ही कोवडी उत्पादनाला कमी असते. या कोवंडयाचे वजन जास्त असल्याने ही मांस उत्पादनासाठी वापरतात.

अ)व्हाईट रॉक

१) पांढरी शुभ्र असुन पिसे अखुड.

२) तुरा अखुड व खरवडीत असतो.

३)कातडीचा रंग पिवळा असतो.

४) नराचे वजन सरासरी ४ किलो.

५ )मादिचे वजन सरासरी २.५ किलो.

६) अंडयाचे प्रमान सरासरी ८० ते ९० नग आहे.



ब) -होड आयलंड रेड

१) परदेशातुन आयात.

२) शरीर भारी भरपुर मांस उत्पादन अग्रेसर सर्व उपयोगासाठी चांगली आहे.

३) रंग चमकदार काळा किंवा लाल.

४) पाय पिवळया रंगाचे असतात.

५) नराचे वजन ३.८ किलो.

६) मादिचे वजन २.९ किलो.

७) पंखावर काळे निशान असते.



## ☐ कुक्कुट पालणाच्या पदधती

### १]मोकाट पदधत

: या पदधतीत कोवंडयावर वंधन नसते. या दिवस भर शेतात किंवा मोकळया जागेत राहतात.त्यांना रात्री घरामध्ये किंवा टोपली खाली वंध केली जाते.अशा पदधतीस मोकाट पदधत असे म्हनतात.

फायदे: १) कोवडयांना खादयाचा खर्च कमी असतो.

२) या कोबडंया रोगाला बळी पडत नाही.

३) लक्ष देण्यास विशेष मनुष्य बळ लागत नाही.

४) भांडवली खर्च कमी येतो.

तोटे

१) या कोबंडया फिरत असल्यामुळे शेतातील पिकांचे नुकसान होण्याची शक्यता असते.

२)या कोबंडयाना इतर जनावरा पासुन हानी होन्याची शक्यता असते.

३) अंडयाचे प्रमाण अत्यंत कमी असते.

## २]अर्धमर्यादीत पदधत :

ः या कोवंडयासाठी लाकडी घरटे साधारन पणे १२ फुट × १२ फुट एवढया मापाच्या घरात सरासरी ५० कोंबडया राहु शकतात. कोंवडी घराच्या पुढील जागे भवती जाळीचे कुंपन बाधंतात. अर्धमर्यादित पदधत म्हनजेच कोवंडयाच्या हिडण्या फिरण्यावर मर्यादा असते.

### फायदे

ः १) या कोबडयांना भरपूर सुर्य प्रकाश व हवा उपलब्ध होते.

२) रोगाचे प्रमान कमी राहते.

३) अंडी उत्पादन पुरेसे प्रमानात असते.

४) जंगली जनावरापासुन संवरक्षन होते.

### तोटे ः

१) खादयाचा खर्च वाढतो.

२) साफ सफाईसाठी मनुष्य बळ करावे लागते.

३) सुरवातीला भांडवली खर्च गुंतवावा लागतो.

## ३ )मर्यादित पदधत ः

या कोवंडयांना सतत घरातच राहावे लागत असल्याने त्याच्यां खादयाचे व पिण्याचे पाणी त्याची सोय घरामध्येच केली जाते . या घरामध्ये दोन ते तीन मजले असतात . प्रत्येक मजल्यावर कोवंडया असतात . कोवडयानां सुर्य प्रकाश व हवा राहील यांची दक्षता घेतली असते . प्रत्येक कोवंडीला ४ चौरस फुट जागा राहील एवढयाच कोवंडया ठेवतात . कोवंडी घर अकाराने २५ ते ३0 फुट रूंद व घराची लांवी ५0 ते २00 फुट असावी .

### फायदे ः

१) थोडया जागेत भरपुर कोबंड्या बसतात .

२) अंडी उत्पादन भरपुर मिळते .

३) सर्व कोबडंयावर कमी प्रमानात लक्ष दयावे लागते .

### तोटा ः

१) सुर्य प्रकाश व खेळती हवा न मिळाल्याने कोबडया रोगावर बळी पडतात .

२) खादय व इतर खर्च वाढत राहतो .

३) निष्काळजीपणा मुळे रोगाचे प्रमान वाढु शकते .

**४)पिजरा पदधत** ः या पदधती मध्ये पिंज-याचे शेड तयार केलेले असते. पिंज-यातील शेड १, २, ३ मजली करून पिंज-यामध्ये पक्षी ठेवलेले असतात. घराची दिशा पुर्व पश्चिम ठेवतात. सुर्यप्रकाश व खेळती हवा राहील यांची दक्षता घेतली जाते. थोडया जागेत भरपूर पक्षी ठेवले जातात. पक्षी स्वतंत्र पिंज-यामध्ये असल्यामुळे व्यवस्थीत लक्ष देता येते. यांचे पुढिल पदधतीने घर वांधावे.

१) जमिन टनक असावी.

२) घरे वांधतानां पुर्व पश्चिम वांधावीत.

३) भिंती उंच ठेवाव्यात.

४)गवताचे छप्पर किंवा सिंमेटची पत्रे वापरावी.

५) कोबंडयाच्या घरा मध्ये विजेची सोय असावी.

६) प्रत्येक पक्षास तीन चौरस फुट जागा ठेवावी.

# पिजंरा पदधत



तोटे ः १) प्रत्येक पक्षावरती स्वतत्रं लक्ष देता येता .

२) प्रत्येक पक्षासाठी सरासरी अंडी उत्पातन काढता येते .

३) कमी जागेत भरपुर पक्षी पाळता येतात .

४) अंडयाचे अधिक उत्पादन मिळत

फायदे ः १) भांडवली खर्च जास्त येतो .

२) व्यवस्तापनामध्ये चुक झाल्यास तोटा होण्याची शक्यता असते .

३) हिशोब व नोंद वही व्यवस्थीत न ठेवल्यास तोटा होतो .

## ५ )परिसरातील पदधत ः

ः या मध्ये घराच्या पाठीमागील बाजुस संगोपन केले जाते . रात्री कोंवडयाना घरामध्ये ठेवतात व दिवसा घराच्या मागिल बाजुस सोडले जाते . या पदधती मध्ये खर्च कमी येतो . कोवंडयांना टाकावु पदार्थाचा उपयोग खादय म्हणुन केला जातो .

## ६ )डिपलिटर पदधत

ः या पदधती मध्ये भाताचा भुसा शेगाची टरपले इतर यांचे जमिनीवर अच्छादन केलेले असते . तयार केलेले अच्छादनास गादि पदधत म्हणतात . या घरामध्ये खादयाची व पाण्याची भांडी जमिनीवर ठेवलेली असतात . किंवा शेडला तार बांधुन ती खादय खाण्यासाठी व पाणी पिण्यासाठी अडकवलेली असतात . कोवडयाची विष्टा गादिवर पडत असल्याने डिपलिटर सतत हलवुन कोरडे करावे . हे डिपलिटर थंडीच्या दिवसात उवदार व उन्हाळयात थंड राहत असल्याने पक्षांना त्यावर आराम मिळतो . जर हे डिपलिटर ओले राहत गेले तर त्यांना रोगाचा प्रादुभा होवु शकतो . यासाठी दर सहा महिन्याने किवा डिपलिटर ओले झाल्यावर बदलुन टाकावे . डिपलिटर घराची दिशा पुर्व पश्चिम असावी . व हवा खेळती राहण्यासाठी उत्तर दक्षिन बाजुस जाळया बसवाव्यात .

- **डिप लिटर पदधत**



❖ फायदे

ः १ . एक मनुष्य सर्व पक्षाचे व्यावस्तापन करू शकतो .

२ . अंडी उत्पादन भरपुर प्रमानात मिळते .

३ . रोगराईचे प्रमान अत्यंत कमी .

४ . व्यावस्तापन व दुष्टीकोनातुन ही पधदत चागंली आहे .

❖ तोटा

ः१ सुरवातीला भांडवली खर्च जास्त येतो .

२ खादयाचा खर्च जास्त येतो .

➢कुक्कुटपालन फायदेशीर होण्यासाठी खालील गोष्टीची माहीती करून घणे आवशक्यता असते .

१ .गावठी कोवंडया सरासरी अंडी उत्पादन ६० ते ८० अंडी

२ .व्हईट लेगहॉर्न कोबंडया सरासरी अंडी उत्पादन १८० ते २१० अंडी

३ .-होड आयलॅड रेड सरासरी अंडी उत्पादन १७० ते १८० अंडी

## लसीकरन करताना घ्यावयाची काळजी .

१) लस निरोगी पक्षांनाच दयावी .

२) लस टोचण्याअगोदर दोन दिवस व टोचल्यानंतर दोन दिवस पक्षांना जीवनसत्वे दयावी .

३) लस आनतांना तसेच वापर संपेपर्यत वर्फात ठेवा

४) लस योग्य वयात योग्य प्रमानात व योग्य पदधतीने दयावी .

५) लस तयार केल्यानंतर ती ३ ते ४ तासात संपावी .

## कोंबडयांचे रोग व त्यांची लक्षणे .

### १] रानी खेत ः

१) श्वास घेण्यास त्रास होणे .

२) थरथर काप होणे .

३) अडखळणे .

४) पंख व पाय लुळे पडणे .

५) हालचालीत बदल होणे .

### २] रक्ती हगवन ः

१) पक्षांचा तुरा कमजोर होतो .

२) पक्षी पेंगळतात .

३) पक्षांचे खाणे कमी होते .

४) अंडी उत्पादन कमी होते .

५) अशक्तपणा येतो .

६) पक्षांचे मरण्याचे प्रमान वाढते .

### ३] देवी ः

१)पिसे नसलेल्या भागावर पिवळे फोड येतात .

२) नंतर दोन ते तीन दिवसानी फोडावर खपली येते .

३) पक्षांची भुक मंदावते

४) नाकातुन द्रव्य पदार्थ वाहतो .

५) तोंडात चिगट पदार्थ तयार होतो .

४] मरेक्स ः१) विष्टा पातळ पडते .

२) पंख, पाय, मान लुळी पडते.

३) वजन कमी होणे .

४) श्वासानास त्रास होणे.

५) पिसांच्या मुळाशी सुज येणे.

५] गंबोरा ः

१) पक्षी पेगतात

२) पक्षी अडखळतात

३) पातळ पांढरी हगवन होते.

४) पिसे विष्टे मुळे खराव होतात.

६] डोळयांचे विकार ः १) नाका डोळयातुन पाणी येते .

२) डोळे सुजते.

३) डोळयाचा दाह होतो.

४) डोळयात पांढरा पदार्थ साचतो.

५) वाढ कमी होते.

६) पक्षी अशक्त होतात.

## अंडी देणा-या कोबंडयासाठी प्रतिबंधक लस

| अ.न. | पक्षाचे वय | प्रतिबंधक लस | लस टोचण्याची पदधत |
|---|---|---|---|
| १ . | १ दिवस | मॅरेक्स | पायाच्यास्थायुमध्ये |
| २ . | ५ ते ७ दिवस | लासोटा | नाकातुन किंवा डोळयातुन |
| ३ . | ७ दिवसानंतर | चोची कापणे | चोचीचा शेंडा कापणे . |
| ४ . | ४ आठवडे | ईनफेकसीयस | डोळयात दोन थेंब . |
| ५ . | ५ आठवडे | लासोटा | पिण्याच्या पाण्यातुन देणे . |
| ६ . | ६ आठवडे | देविची लस | पंखाच्या आतील बाजुस |
| ७ . | ७ आठवडे | राणि खेत | पंखाच्या आतील बाजुस |
| ८ . | १० ते १२आठवडे | चोची कापणे . | वाढलेल्या चोची कापणे व डाग देणे . |
| ९ . | १८ आठवडे | देविची लस | पंखाच्या आतील बाजुस लस टोचणे . |
| १० . | २० आठवडे | राणि खेत | पंखाच्या आतील बाजुस लस टोचणे . |
| | | | |
| | | | |

## कोवंडयाना लागणारी जागा .

| अ न. | वय | वसण्याची जागा | पाण्याची भांडी ठेवण्याची जागा | खादयाची भांडी |
|---|---|---|---|---|
| १ . | ० ते ६ आठवडे | ०.५० चौरस फुट | १/४ ईच | २ ईच |
| २ . | ७ ते १२ आठवडे | १.५० चौरस फुट | १/२ ईच | ३ ईच |
| ३ | १२ते १७ आठवडे | १.५० चौरस फुट | १/४ ईच | ४ ईच |
| ४ | १७ आठवडयाचे | १.७५ चौरस फुट | १ ईच | ५ ईच |

❖ कोवंडयाना खादय देण्याचे प्रमाण (१००)पक्षासाठी

| अ न | वय आठवडयात | आठवडयात लागणारे खादय | वय आठवडयात | आठवडयात लागणारे खादय |
|---|---|---|---|---|
| १ . | १ | ७ किलो . | १० | ५२ किलो . |
| २ . | २ | १३ किलो . | ११ | ५५ किलो . |
| ३ . | ३ | १९ किलो . | १२ | ५७ किलो . |
| ४ . | ४ | २६ किलो . | १३ | ५९ किलो . |
| ५ . | ५ | ३२ किलो . | १४ | ६३ किलो . |
| ६ . | ६ | ४० किलो . | १५ | ६५ किलो . |
| ७ . | ७ | ४५ किलो . | १६ | ६७ किलो . |
| ८ . | ८ | ४८ किलो . | १७ | ७७ किलो . |
| ९ . | ९ | ५० किलो . | | |

## ➢अंडी देण्याचे प्रमाण कोवंडयाचे वजन व वय

१. एका पक्षाचे एका वर्षाचे उत्पादन २१० ते २२०

२. १२ आठवडयाचे उत्पादन मिळवण्याकरता लागणारे खादय १.३० ते १.८१ किलो

३. २० आठवडयाचे कोवंडयाचे वजन १.१३ ते १.३० किलो

४. ७२ आठवडयात कोवंडयाचे वजन १.८० ते १.९५ किलो

५. पहिले अंडी मिळवण्याच्या वेळी कोवंडयाचे वय १३० ते१४० दिवस

## मटनाच्या कोवंडया

ः कोवंडयाची पिले एका दिवसापासुन ८ ते १० आठवडयापर्यंत वाढवुन त्या कोवंडयाना मटणासाठी उपयोग करतात. या कोवंडयाना ब्रॉयलर म्हणतात. या कोवंडया

झोमाने वाढतात. व त्याच प्रमाने त्या जेवढया आतिल प्रमाणात खादयाचे रूपांतर मांसामध्ये केले जाते .त्यामुळे अशा कोवंडयाचे वजन७ ते ८ आठवडयात १२०० ते १४००ग्रम होते.

मटनाच्या कोवंडया वाढवण्यासाठी दोन प्रकारची खाादय वापरली जातात.

१. ब्रायलर स्टार्टर मॅश =१ ते ३० दिवसापर्यंत १ किलो.

२. ब्रायलर फिनिशर = ३१ ते ६० दिवसापर्यंत २ ते ३ किलो.

## मटनाच्या कोबंडयासाठी लस टोचण्याचा कार्यक्रम

| अ . न . | पक्षाचे वय | प्रतिबधंक उपाय | लस टोचण्याची पदधत |
|---|---|---|---|
| १ . | १ दिवस | मॅरेक्स | पयाच्या स्थायुमध्ये देणे . |
| २ . | ५ते ७ दिवस | लासोटा | नाकातुन दोन थेंब . |
| ३ . | ५ वा आठवडा | लासोटा | पाण्यातुन देणे . |

## ➢कोबंडयाचे महत्वाचे रोग प्रसार आणि उपचार

अ) जीवानुमुळे होणार रोगे .

ब) अति सुक्ष्मविषाणापासुन .

क) एक पेशीय जंतुपासुन .

### ✓कोबंडयाचे महत्वाचे रोग प्रसार आणि उपचार

अ) जिवनामुळे होनारे रोग

१) कॉलरा ः पक्षी अचानक मरने किंवा ताप येणे .

उपाय = सलमेट सारखि औषधे खादयातुन व पाण्यातुन देणे .

२) वाढती हगवन ः लहान पिलाचा रोग किंवा पोट दुखणे

उपाय =मॅक्टनि सारखी औषधे पाण्यातुन देणे .

३) निळा तुरा ः मोठया पक्षांना होतो . ताप येणे .

उपाय = स्टेकलीन औषध पाण्यातुन देणे .

व )अति सुक्ष्मविषाणापासुन

१ )राणि खेत ः मान वाकडी होने श्वासास त्रास होणे .

उपाय = नाही .

२) देवि ः ताप येणे .

उपाय = देविची लस टोचणे .

३) मॅरेक्स ः १ ते १५ दिवसाच्या पिलांना रोग .

उपाय = पिलांना या रोगाची लस टोचणे .

- ई) अंर्तगत बाहय कीटानुपासुन
- १ )पोटातील जंतुमुळे पक्षांची भुक मदांवते .
- उपाय = महिण्यातुन एकदा जंतुनाशक औषधे पाण्यातुन देणे .
- २ )गोचीड ,उवा कोवंडयाच्या पंखावर .
- उपाय = कोवंडयाच्या पंखाली वी .एच .सी .पावडर टाकावी .